# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः27.07.2025 वारःरविवार

---

1. भारत-मालदीव्ज भविष्यात भागिदारी दृढ करण्यास उत्सुक

2. पंतप्रधान आज आकाशवाणीवरुन करणार मन की बात

3. करगिल विजय दिवस देशभरात उत्साहात साजरा

4. बुद्धिबळात कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुखचा पहिला गेम बरोबरीत, क्रिकेटमध्ये भारताला इंग्लंडविरुद्ध मालिका बरोबरीत आणण्याची संधी आणि

5. राज्यातील अनेक धरणांमधून पाण्याचा विसर्ग

**<u>पीएम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला मालदीव दौरा अत्यंत यशस्वी झाल्याचं म्हटलं आहे. मालदीवच्या ६० व्या स्वातंत्र्यदिन वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मालदीवचे अध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइझ्झू यांनीही मोदींचा हा दौरा महत्त्वाचा असल्याचं सांगून द्विपक्षीय संबंधांच्या भविष्याला एक नवा आकार देणारा असल्याचं म्हटलं आहे.

भारत आणि मालदीव मत्स्यव्यवसाय, हवामानशास्त्र, डिजिटल पायाभूत सुविधा इत्यादी अनेक क्षेत्रात करार करून त्यांचे द्विपक्षीय संबंध मजबूत करत असतानाच भारताने मालदीवच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ४ हजार ८५० कोटी रुपयांचा पतपुरवठा करण्याचंही जाहीर केलं आहे. याशिवाय, दोन्ही देशांनी आर्थिक संबंध आणि द्विपक्षीय व्यापार मजबूत करण्याच्या उद्देशाने मुक्त व्यापार करारावर वाटाघाटी सुरू केल्या आहेत.

यंदा उभय देशांमधील राजनैतिक संबंधांच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होण्याप्रीत्यर्थ विशेष टपाल तिकिटही जारी केलं आहे. दोन्ही देशांनी संरक्षण आणि सागरी सुरक्षा सहकार्य आणखी मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे. पहलगाम

दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारतासोबत असल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी राष्ट्रपती मुइझ्झू यांचे आभार मानले.

**<u>मकीबा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १२४ वा भाग असेल. हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजएअर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**<u>वॉका-करगिल</u>**

**<u>इंट्रो</u>**

भारतीय सैन्याच्या शौर्याची, धैर्याची आणि बलिदानाची आठवण म्हणून काल देशभर २६ वा करगिल विजय दिवस मोठय अभिमानानं आणि देशभक्तीच्या उत्साहानं साजरा करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह सर्व संरक्षण दलांच्या प्रमुखांनी देशासाठी बलिदान दिलेल्या शूर सैनिकांना आदरांजली अर्पण केली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही समाजमाध्यमावरून करगिल युद्धात शौर्य गाजवलेल्या आणि शहीद झालेल्या जवानांना अभिवादन केलं. राज्यात करगिल विजय दिवसाचं औचित्य साधून आयोजित विविध कार्यक्रमांवर आधारित हा वृत्तांत...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

नागपूरमध्ये महाराष्ट्र एअर स्क्वॉड्रन एनसीसीच्या नागपूर मुख्यालयाच्या वतीनं शूर सैनिकांना मानवंदना देण्यात आली. करगिल युद्धात प्राण अर्पण करणाऱ्या शूर सैनिकांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. पुण्यामध्ये दक्षिण मुख्यालयाचे जनरल ऑफिसर चीफ लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्यासह इतर प्रमुखांनी शहिदांना श्रद्धांजली वाहिली. सातारा इथल्या सैनिक स्कूलच्या सभागृहात पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अहिल्यानगर इथं केंद्रीय संचार ब्युरोद्वारे शिर्डीच्या साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुलामध्ये तसंच सोलपुर, नांदेड, आणि परभणी जिल्हा सैनिकी कार्यालयानं जिल्हाधिकारी कार्यालयात, करगिल विजय दिवस साजरा केला. यावेळी करगिल विजयावर आधारित कवितांचं

सादरीकरण, प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध लेखन, समूहगीत गायन, चित्रकला, वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आला होतं. ऑपरेशन सिंदूर आणि करगिल विजय फेरीचं आयोजनही करण्यात आलं होतं. तसचं युद्धामध्ये शहीद झालेल्या जवानांच्या वीरपत्नी, वीर मातांचा, माजी सैनिकांचा आणि सैनिकी कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांसह पूजा दीक्षित, पुणे.

**<u>संसदरत्न</u>**

सतरा खासदारांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नवी दिल्लीत एका स्वयंसेवी संस्थेद्वारे यावर्षीचे संसदरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातून, वर्षा गायकवाड, सुप्रिया सुळे आणि अरविंद सावंत या सदस्यांचा समावेश आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी हा पुरस्कार खासदारांच्या उत्कृष्ट कामगिरीची ओळख असल्याचं सांगून पुरस्कार मिळालेल्या सर्व खासदारांचे अभिनंदन केलं.

**<u>वॉका-दुर्मिळ-वनस्पती</u>**

सिंधुदुर्गात वैभववाडी कॉलेजचे प्राध्यापक आणि विद्यार्थिनींनी केलेल्या संशोधनात तीन दुर्मिळ वनस्पती सापडल्या आहेत.

भुईचाफा, चिकट मत्स्याक्षी आणि गाठी तुळस या दुर्मिळ वनस्पतींच्या शोधाबद्दल आकाशवाणीचे प्रतिनिधी निलेश जोशी यांच्याशी बोलताना वनसंपत्ती शास्त्रज्ञ डॉक्टर विजय पैठणे म्हणाले..

**<u>हिंजवडी कोंडी</u>**

असलेल्या हिंजवडी परिसरासह माण, म्हाळुंगे, सूस या भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता काल उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी या भागाची पाहणी केली. आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीनं कराव्यात, मेट्रोची सुरु असलेली कामं गतीनं पूर्ण करावीत, विविध विकास कामं आणि रस्त्याची कामं करताना स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांना विश्वासात घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावा, असे निर्देश पवार यांनी यानंतर आयोजित बैठकीत दिले.

**सहकार**

राष्ट्रीय सहकार धोरण यशस्वी करण्याचं आव्हान स्विकारून  सहकार बळकट करा असं आवाहन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले इथं विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायट्यांच्या सचिवांच्या  संघटनेच्या राज्यस्तरीय अधिवशनाचं उद्घाटन करताना केलं. सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यावेळी उपस्थित होते. सोसायट्यांचं मानांकन करून त्याच्या दर्जानुसार बॅकींग प्रणालीशी जोडून घेण्याचे प्रयत्न झाले तर सोसायट्यांना व्यवसायाची साखळी निर्माण होईल असंही विखे-पाटील यांनी सुचवलं.

**बुद्धिबळ**

जॉर्जियात बटुमी इथं फिडे महिला विश्व करंडक स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख यांचा पहिला गेम काल बरोबरीत राहिला. दुसरा गेम आज होऊन विजेता ठरेल. या स्पर्धेच्या इतिहासात अंतिम लढतीमध्ये दोन्ही भारतीय खेळाडू असल्यानं भारतासाठी हा एक अद्भुतक्षण आहे.

**क्रिकेट**

मँचेस्टर इथल्या चौथ्या कसोटीत भारताच्या दुसऱ्या डावात चौथ्या दिवसअखेर 4 बाद 174 धावा झाल्यामुळं मालिकेत बरोबरी साधण्याची भारताला संधी आहे. भारताला विजयासाठी अद्याप 137 धावांची गरज आहे. दुसऱ्या डावात 311 धावांचं उद्दिष्ट घेऊन खेळताना भारताचे पहिले दोन गडी पटपट बाद झाले. कर्णधार शुभमन गिल आणि के एल राहुलनं खिंड लढवत भारतासाठी विजयाची आशा निर्माण केली आहे.

**पाऊस**

राज्यात सर्वदूर भरपूर पाऊस झाल्यामुळं धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. परिणामी अनेक धरणांचे दरवाजे गरजेनुसार उघडून त्यातून नदीपात्रांमध्ये पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळं लोकांना सावधिगिरीचा इशारा देण्यात आला आहे.

नांदेडमधील विष्णुपुरी प्रकल्पाचा एक दरवाजा काल प्रथमच उघडण्यात आला.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात तसंच उजनी धरण क्षेत्रात दमदार पावसामुळं पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यात येत आहे. पाण्याचे हे विसर्ग आवश्यकतेनुसार वाढविण्यात येतील असा खबरदारीचा इशाराही पाटबंधारे विभागानं दिला आहे.

रत्नागिरीत पावसाचा जोर कायम असून, रात्री १० वाजताच्या स्थितीनुसार खेडमधली जगबुडी नदी इशारा पातळीच्या वरून वाहत आहे.

रायगड जिल्ह्यात मासेमारीवर निर्बंध असतानाही समुद्रात गेलेल्या आठ मासेमारांची बोट खांदेरी किल्ल्याजवळ काल रात्री बुडाली. पाचजण पोहून किनाऱ्यावर आले, तीन मासेमार बेपत्ता आहेत.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.